0001

## नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई यांचे समोर

**वाचावे :-** १) वरिष्ठ पोलिस निरिक्षक, ट्रॉम्बे पोलिस ठाणे, मुंबई यांचेकडून दिनांक ०६/०८/२०१२ रोजीच्या पत्रासोबत प्राप्त झालेले कागदपत्रे.

२) या कार्यालयाची "कारणे दाखवा नोटीस" क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.५७/२०१२/जा.५४८, दिनांक ०९/०८/२०१२ व ३०/०८/२०१२.

३) वरिष्ठ पोलिस निरिक्षक, ट्रॉम्बे पोलिस ठाणे, मुंबई यांचे दिनांक २९/०८/२०१२ रोजी टपालामार्फत प्राप्त लेखी अभिवेदन.

४) वरिष्ठ पोलिस निरिक्षक, ट्रॉम्बे पोलिस ठाणे, मुंबई यांचे दिनांक ११/०९/२०१२ रोजीचे लेखी अभिवेदन.

५) बार्ज (नौका) या बोटीचे भाडेकरारनाम्यांद्वारे ताबेदार सुरेंद्र श्रीकृष्ण यादव, अकबर अनसारी सय्यद व अल्ताफ उर्फ कादर मोईद्दीन सय्यद यांचे दिनांक १२/०९/२०१२ रोजीचे स्वंतत्र लेखी निवेदने.

CONTROLLER OF RATIONING & DIRECTOR OF CIVIL SUPPLIES

क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.५७/२०१२/जा. ६७०
नियंत्रक शिधावाटप व संचालक
नागरी पुरवठा यांचे कार्यालय,
रॉयल इन्शुरन्स इमारत, ५ वा मजला,
१४, ज.टाटा मार्ग, चर्चगेट, मुंबई - २०.
दिनांक २५/०९/२०१२.

### आ दे श

**(जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ अन्वये)**

**प्रकरणाची पार्श्वभूमी :-**

दिनांक २७/०७/२०१२ रोजी श्री. खैरे वरिष्ठ पोलिस निरिक्षक, ट्रॉम्बे पोलिस ठाणे, मुंबई यांना फोनद्वारे माहिती मिळाली कि, ट्रॉम्बे जुनी जेट्टी या ठिकाणी काही अनुचीत प्रकार चालू आहे. त्याबाबत खात्री करण्यासाठी रात्रो २०.५० वाजताचे सुमारास श्री. खैरे यांनी पो.शि.क्र. ३१०८६ श्री. प्रमोद सवाखंडे यांना सांगितल्याने त्याप्रमाणे त्यांनी रात्रपाळी पर्यवेक्षण अधिकारी स.पो.निं. श्री. चव्हाण यांना सदरची माहिती देऊन त्यांचे सह पो.शि.क्र. ९८०२८२, पो.शि.क्र. ०३६६८, पिटर चालक पो.ना. ३४०४२ व ऑपरेटर पो.शि. ३२७७५ यांचेसह रात्रो २१.०५ वाजता पोलिस ठाणे येथून ट्रॉम्बे जुनी जेट्टीकडे जाण्यास रवाना झाले. सदर पथक ट्रॉम्बे जुनी जेट्टी येथे २१.१५ वाजताचे सुमारास पोहचले व सदर परिसराची पहाणी करु लागले असता, नमूद ठिकाणी २३.०० वाजताचे सुमारास एक बार्ज (नौका) समुद्राच्या किनाऱ्याला गाळामध्ये लागलेला दिसला. सदर बार्जची दुरुन पाहणी केली असता,

त्यावर तीन इसम असल्याचे व त्याच्या हालचाली संशयास्पद असल्याच्या दिसून आल्याने वरील पथक नमूद बार्जजवळ गेले व संदर बार्जवरील इसमांकडे चौकशी करुन त्यांची नांवे विचारली असता, त्यांनी त्यांची नांवे १) अकबर अन्सारी सैय्यद, २) सुरेंद्र श्रीकृष्ण यादव, ३) मोहमद अहमद खान असे असल्याचे सांगितले. त्यांचेकडे अधिक चौकशी केली असता, त्यांच्या उत्तरात विसंगती आढळून आल्याने पथकातील अधिकाऱ्यांनी सदर बार्जची (नौकेची) तपासणी केली असता, नमूद बार्जच्या मुख्य टाकीत कच्चे तेल असल्याचा संशय वाटु लागला. याबाबत त्यांचेकडे विचारणा केली असता, सदर इसमांनी काही सांगण्यास नकार दिला म्हणून त्यांना चौकशी कामी ताब्यात घेण्यात आले. सदर ठिकाणी सदरचा बार्ज हा दलदलीच्या परिसरात असून त्या ठिकाणी संपूर्ण प्रकाश नसल्याने पाहणी करण्याची परिस्थिती नव्हती. म्हणून सदर ठिकाणी बार्जवर पहाऱ्यासाठी पो.ना.क्र. ११३६५ व पो.ना.क्र. २९३६१ यांची सशस्त्र नेमणूक करण्यात आली.

सदर बार्जवर दिनांक २८/०७/२०१२ रोजी सकाळी दोन पंचांसह जाऊन बार्जची संपूर्णपणे दिवसा उजेडी पाहणी करण्यात आली व सदर बार्जचा पंचनामा करण्यात आला. सदर बार्जच्या टाकीमध्ये एकूण अंदाजे ६००० लिटर ल्युब ऑईलचा साठा मिळून आला. सदर बार्जच्या टाकीमधील ल्युब ऑईलचे वेगवेगळे नमुने रासायनिक तपासणीसाठी काढून घेण्यात आले व जागीच सिल करुन त्यावर पंचाच्या सह्या घेण्यात आल्या आहेत. याबाबत ताब्यात घेण्यात आलेल्या इसमाच्या चौकशीमध्ये त्यांनी वर नमूद ल्युब ऑईल हे डोंगरी येथील वास्तवास असणारा इसम नामे अल्ताफ यांच्या संगणमताने समुद्रातील लागलेल्या मोठ्या जहाजातून अनधिकृतपणे काढून सदर बार्जमध्ये घेऊन अनधिकृतपणे विक्री करण्यासाठी ट्रॉम्बेच्या जुन्या जेट्टी येथे घेऊन आल्याचे सांगितले.

अशाप्रकारे वरील इसमांनी दिनांक २७/०७/२०१२ रोजी २३.०५ वाजता आपआपसात संगणमत करुन त्यांनी ल्युब ऑईल हा ज्वालाग्राही पदार्थ अनधिकृतपणे चोरुन विकण्याच्या इराद्याने स्वतःच्या कब्जात बाळगल्याने, पर्यायाने त्यांनी शासनाची तसेच उपभोक्त्यांची फसवणूक केल्याचे सिध्द होत असल्याने संबंधितांविरुध्द १) जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ३ व ७ तसेच २) भा. द. वि. चे कलम २८५ व ३४ चा भंग केल्यावरुन ट्रॉम्बे पोलिस ठाणे, मुंबई येथे गुन्हा नोंद क्र. १४५/२०१२, दिनांक २८/०७/२०१२ अन्वये गुन्हा नोंद करुन खालील मुद्देमाल जप्त करण्यात आला:

| अ. क्र. | जप्त मुद्देमाल तपशिल | नग / साठा | जप्त मुद्देमालाची एकूण किंमत (रुपये) |
|---|---|---|---|
| १ | ३० बॅरलमधील ल्युब ऑईलचा साठा | ६००० लिटर | ६,००,०००/- |
| २ | बार्ज (नौका) | १ नग | ४,००,०००/- |
| | | एकूण | १०,००,०००/- |

उपरोक्त जप्त मुद्देमालाची जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ प्रमाणे विल्हेवाट लावण्याची विनंती वरिष्ठ पोलिस निरिक्षक, ट्रॉम्बे पोलिस ठाणे, मुंबई यांनी केलेली असून, जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-ब नुसार सर्व संबंधितांना वरील वाचावे क्र. २ मध्ये नमूद केल्याप्रमाणे कारणे दाखवा नोटीस बजावून या प्रकरणी जप्त करण्यात आलेला मुद्देमाल सरकारजमा का करण्यात येऊ नये, याची कारणे स्पष्ट करणारा खुलासा मागविण्यात आला. तसेच मौखिक खुलासा करण्याची संधी म्हणून दिनांक २८/०८/२०१२ रोजी या कार्यालयात सुनावणी ठेवण्यात आली.

दिनांक २८/०८/२०१२ रोजीच्या सुनावणीस तपासी पोलिस अधिकारी तसेच आरोपी/अपचारी यापैकी कोणीही उपस्थित राहीले नाहीत. सबब, सर्व संबंधितांना त्यांचे म्हणणे मांडण्यासाठी पुढील सुनावणी दिनांक १२/०९/२०१२ रोजी ठेवण्यात आली.

दिनांक १२/०९/२०१२ रोजीच्या सुनावणीस तपासी पोलिस अधिकारी श्री जयवंत रामचंद्र चव्हाण हे उपस्थित राहीले व त्यांनी यापूर्वी वाचावे क्रमांक ३ अन्वये वरिष्ठ पोलिस निरीक्षक यांचेवतीने लेखी अभिवेदन सादर केल्याचे सांगुन नमुद गुन्हयातील जप्त करण्यात आलेल्या छोटया बार्जचे मालक यांचा पत्ता मिळुन आलेला नसल्याचे सांगुन सदरचे बार्ज नमुद गुन्हयातील आरोपीतांनी भाडेतत्वावर घेतल्याचे सांगितले. तसेच इतर आरोपी हे न्यायीक कोठडीत असल्याने ते सुनावणीस गैरहजर असल्याचे सांगुन सदरचे जप्त छोटे बार्ज हे ट्रॉम्बे जेटी येथे ठेवण्यात आले असुन ते चिखलात रुतले असल्याने ते कलंडल्यास त्यामधील जप्त ऑईलचा साठा वाहुन जाण्याची शक्यता नाकारता येत नाही. तरी नमुद मुद्देमालाचे लवकरात लवकर विल्हेवाटीचे आदेश पारीत करण्यात यावे अशी विनंती केली.

सदर सुनावणीस बार्ज (नौका) या बोटीचे भाडेकरारनाम्याद्वारे ताबेदार सुरेंद्र श्रीकृष्ण यादव, अकबर अनसारी सय्यद व अल्ताफ उर्फ कादर मोईद्दीन सय्यद यांनी उपस्थित राहुन त्यांचे स्वतंत्र लेखी निवेदने सादर केले. तसेच सदर सुनावणीसही इतर आरोपी /अपचारी यांना पुरेशी संधी देवून देखील ते उपस्थित राहीले नाहीत.

सबब, प्रकरण गुणवत्तेच्या आधारे निर्णयास्तव राखुन ठेवण्यात आले.

ECTOR OF CIVIL SUP... FICE

**<u>युक्तीवाद :-</u>**

वरिष्ठ पोलिस निरिक्षक, ट्रॉम्बे पोलिस ठाणे, मुंबई यांनी दिनांक २९/०८/२०१२ रोजी टपालामार्फत सादर केलेल्या लेखी अभिवेदनात, सदर बार्जच्या टाकीमध्ये एकुण अंदाजे ६००० लिटर ल्युब ऑईल मिळुन आल्याने ते

बार्जसह पंचनामा करुन ताब्यात घेण्यात आलेल्या इसमांच्या चौकशीमध्ये त्यांनी नमुद ल्युब ऑईल हे अटक आरोपी नामे कादर मोईद्दील सय्यद उर्फ यांच्या संगनमताने समुद्रातील लागलेल्या मोठया ज़हाजातुन अनधिकृतपणे काढुन सदर बार्जमध्ये घेऊन अनधिकृतपणे विक्री करण्यासाठी ट्रॉम्बे येथील जुन्या जेट्टी येथे घेऊन आल्याची कबुली दिली. यावरुन सदर इसमांनी आपआपसात संगनमत करुन त्यांनी ज्वालाग्राही पदार्थ अनधिकृतपणे चोरुन विकण्याच्या इरादयाने स्वतःच्या ताब्यात कब्जात बाळगला म्हणुन नमुद गुन्हयातील आरोपी अकबर अंन्सारी सय्यद, सुरेन्द्र श्रीकृष्ण यादव, मोहम्मद अहमद खान व कादर मोईद्दीन सय्यद उर्फ अल्ताफ यांनी गुन्हयाच्या तपासादरम्यान कबुली जबाब दिला आहे. सदर गुन्हयाचा तपास अद्याप चालु असुन गुन्हयातील अटक आरोपी यांच्या ताब्यातुन घटनास्थळावरुन जप्त करण्यात आलेल्या एकुण ६००० लिटर ल्युब ऑईल व बार्ज (नौका) या संदर्भात आपल्या कार्यालयामार्फत पुढील योग्य ते आदेश होण्यास विनंती असे नमुद आहे. तसेच दिनांक ११/०९/२०१२ रोजीच्या अभिवेदनात, गुन्हयातील मोहम्मद अहमद खान हा सध्या मा. न्यायालयाच्या आदेशान्वये न्यायालयीन कोठडीत असल्याने त्यांना नमुद कारणे दाखवा नोटीसची बजावणी करता आलेली नाही. त्याचप्रमाणे गुन्हयात जप्त करण्यात आलेल्या बार्ज (नौका) याचा मालक अद्याप मिळुन आल्याने त्यास अटक करण्यात आलेली नाही असे नमुद आहे.

दिनांक १२/०९/२०१२ रोजीच्या सुनावणीस उपस्थित बार्ज (नौका) या बोटीचे भाडेकरारनाम्याद्वारे ताबेदार सुरेंद्र श्रीकृष्ण यादव यांनी सादर केलेल्या लेखी निवेदनात, त्याने साई-शाह ही फायबर बोट शाहताज खाला यांच्याकडुन मासे पकडण्यासाठी भाडेतत्वावर घेतली असुन त्याच्या रिपेअरींग साठी त्याने सदर फायबर बोट ट्रॉम्बे जेट्टी येथे उभी केली होती. सदर बोट जास्त दिवसापासुन उभी असल्याने त्याच्या कप्प्यात पाणी भरले होते. तद्नंतर त्याला अचानकरित्या ट्रॉम्बे पोलिसांकडून खबर लागली की, त्याच्यावर केस दाखल केली आहे व त्यास अटक करण्यात आले. त्याच्या माहितीनुसार सदर बोटीत कचरा व पाणी व्यतिरीक्त काही नाही. सदर केस रद्द करुन त्याची बोट परत करण्याची विनंती केली. कारण त्याचे व बोटीचे मालक यांचे उदरनिर्वाहाचा साधन हे एकमेव बोट आहे असे नमुद करुन तसे लेखी निवेदन सादर केले.

दिनांक १२/०९/२०१२ रोजीच्या सुनावणीस उपस्थित अकबर अनसारी सय्यद याने सादर केलेल्या लेखी निवेदनात, ट्रॉम्बे पोलिसांनी त्याच्यावर लावण्यात आलेले आरोप हे चुकीचे असुन सदर बोट व त्यामधील वस्तुच्या बाबतीत त्यास काहीही माहिती नसल्याने त्याच्यावरील लावण्यात आलेले आरोप रद्द करण्याची विनंती करुन तसे लेखी निवेदन सादर केले.

CONTROLLER OF RATIONING & ... HEAL... MU...

दिनांक १२/०९/२०१२ रोजीच्या सुनावणीस उपस्थित अल्ताफ उर्फ कादर मोईद्दीन सय्यद याने सादर केलेल्या लेखी निवेदनात, त्याच्यावर लावण्यात आलेले आरोप चुकीचे असुन त्याला हे ही माहिती नाही की त्याचे नांव या केसमध्ये घेतले आहे. गुन्हे शाखा यांनी जबरदस्तीने त्याला अटक करुन ट्रॉम्बे पोलिस यांच्या सुपुर्द केले त्यावेळेस त्याला या केसबाबत खबर लागली असुन त्याचे नांव या केसमधुन काढण्यात यावे अशी विनंती करुन तसे लेखी निवेदन सादर केले.

<u>निष्कर्ष</u> :-

प्रस्तुत प्रकरणातील आरोपी/अपचारी यांचा युक्तिवाद, निवेदन, अभिवेदन व अभिलेखावरील उपलब्ध पुरावादर्शक कागदपत्रे विचारात घेऊन मी खालील प्रमाणे निष्कर्ष काढीत आहे.

प्रस्तूत प्रकरणी, दिनांक २७/०७/२०१२ रोजी ट्रॉम्बे पोलिस ठाणे, मुंबई यांना फोनद्वारे माहिती मिळाली कि, ट्रॉम्बे जुनी जेट्टी या ठिकाणी काही अनुचीत प्रकार चालू असुन त्याबाबत खात्री करण्यासाठी तेथील पोलिस पथक हे ट्रॉम्बे जुनी जेट्टी येथे जावुन सदर परिसराची पहाणी करु लागले असता, नमूद ठिकाणी एक बार्ज (नौका) समुद्राच्या किनाऱ्याला गाळामध्ये लागलेला दिसला. सदर बार्जची दुरुन पाहणी केली असता, त्यावर तीन इसम असल्याचे व त्यांच्या हालचाली संशयास्पद असल्याच्या दिसून आल्याने वरील पथक नमूद बार्जजवळ गेले व सदर बार्जवरील इसम नामे अकबर अन्सारी सैय्यद, सुरेंद्र श्रीकृष्ण यादव व मोहमद अहमद खान यांच्याकडे अधिक चौकशी केली असता, त्यांच्या उत्तरात विसंगती आढळून आल्याने पथकातील अधिकाऱ्यांनी सदर बार्जची (नौकेची) तपासणी केली असता, नमूद बार्जच्या मुख्य टाकीत कच्चे तेल असल्याचा संशय वाटु लागला. याबाबत सदर इसमांनी काही सांगण्यास नकार दिला म्हणून त्यांना चौकशी कामी ताब्यात घेण्यात आले. सदर बार्जवर दिनांक २८/०७/२०१२ रोजी सकाळी दोन पंचांसह जाऊन बार्जची संपूर्णपणे दिवसा उजेडी पाहणी केली असता सदर बार्जच्या टाकीमध्ये एकूण अंदाजे ६००० लिटर ल्युब ऑईलचा साठा मिळून आला. याबाबत ताब्यात घेण्यात आलेल्या इसमांच्या चौकशीमध्ये त्यांनी वर नमूद ल्युब ऑईल हे डोंगरी येथील वास्तवास असणारा इसम नामे अल्ताफ याच्या संगणमताने समुद्रातील लागलेल्या मोठ्या जहाजातून अनधिकृतपणे काढून सदर बार्जमध्ये घेऊन अनधिकृतपणे विक्री करण्यासाठी ट्रॉम्बेच्या जुन्या जेट्टी येथे घेऊन आल्याचे सांगितले. सदर आरोपीतांनी आपआपसात संगणमत करुन त्यांनी ल्युब ऑईल हा ज्वालाग्राही पदार्थ अनधिकृतपणे चोरुन विकण्याच्या इराद्याने स्वत:च्या कब्जात बाळगल्याने, पर्यायाने त्यांनी शासनाची तसेच उपभोक्त्यांची फसवणूक केल्याचे सिध्द होत असल्याने संबंधितांविरुध्द गुन्हा नोंद करुन मुद्देमाल जप्त करण्यात आला.

प्रस्तुत प्रकरणी, बार्ज (नौका) या बोटीचे भाडेकरारनाम्याद्वारे ताबेदार सुरेंद्र श्रीकृष्ण यादव यांनी सुनावणीच्या वेळी केलेल्या खुलाशात, त्याने सदरची साई-शाह ही फायबर बोट शाहताज ख्वाला यांच्याकडुन मासे पकडण्यासाठी भाडेतत्वावर घेतली असुन त्याच्या रिपेअरींग साठी त्याने सदर फायबर बोट ट्रॉम्बे जेट्टी येथे उभी केली होती. सदर बोट जास्त दिवसापासुन उभी असल्याने त्याच्या कप्प्यात पाणी भरले होते. तद्नंतर त्याला अचानकरित्या ट्रॉम्बे पोलिसांकडून खबर लागली की, त्याच्यावर केस दाखल केली आहे व त्यास अटक करण्यात आले. त्याच्या माहितीनुसार सदर बोटीत कचरा व पाणी व्यतिरीक्त काही नाही असे सांगितले. अकबर अनसारी सय्यद याने सुनावणीच्या वेळी केलेल्या खुलाशात, ट्रॉम्बे पोलिसांनी त्याच्यावर लावलेले आरोप हे चुकीचे असुन सदर बोट व त्यामधील वस्तुच्या बाबतीत त्यास काहीही माहिती नसल्याने त्याच्यावरील लावण्यात आलेले आरोप रद्द करण्यात यावे असे सांगितले. तसेच अल्ताफ उर्फ कादर मोईद्दीन सय्यद याने सुनावणीच्या वेळी केलेल्या खुलाशात, त्याच्यावर लावण्यात आलेले आरोप चुकीचे असुन त्याला हे ही माहिती नाही की त्याचे नांव या केसमध्ये घेतले आहे. गुन्हे शाखा यांनी जबरदस्तीने त्याला अटक करुन ट्रॉम्बे पोलिस याच्या सुपुर्द केले त्यावेळेस त्याला या केसबाबत खबर लागली असुन त्याचे नाव या केसमधुन काढण्यात यावे असे सांगितले.

तथापी, वरिष्ठ पोलिस निरिक्षक, ट्रॉम्बे पोलिस ठाणे, मुंबई यांनी दिनांक २९/०८/२०१२ रोजी टपालामार्फत सादर केलेल्या लेखी अभिवेदनात, नमुद गुन्हयातील ताब्यात घेण्यात आलेल्या इसमांच्या चौकशीमध्ये त्यांनी नमुद ल्युब ऑईल हे अटक आरोपी नामे कादर मोईद्दील सय्यद उर्फ अल्ताफ यांच्या संगनमताने समुद्रातील लागलेल्या मोठया जहाजातुन अनधिकृतपणे काढुन सदर बार्जमध्ये घेऊन अनधिकृतपणे विक्री करण्यासाठी ट्रॉम्बे येथील जुन्या जेट्टी येथे घेऊन आल्याची कबुली दिली. तसेच सदर इसमांनी आपआपसात संगनमत करुन त्यांनी ज्वालाग्राही पदार्थ अनधिकृतपणे चोरुन विकण्याच्या इरादयाने स्वतःच्या ताब्यात कब्जात बाळगला म्हणुन नमुद गुन्हयातील आरोपी अकबर अंन्सारी सय्यद, सुरेंन्द्र श्रीकृष्ण यादव, मोहम्मद अहमद खान व कादर मोईद्दीन सय्यद उर्फ अल्ताफ यांनी गुन्हयाच्या तपासादरम्यान कबुली जबाब दिला असल्याचे नमुद आहे.

उपरोक्त विवेचन विचारात घेता नमुद गुन्हयातील आरोपी अकबर अंन्सारी सय्यद, सुरेंन्द्र श्रीकृष्ण यादव, मोहम्मद अहमद खान व कादर मोईद्दीन सय्यद उर्फ अल्ताफ यांनी सुनावणीचे वेळी सादर केलेले निवेदन हे मोघम स्वरुपाचे व दिशाभुल करणारे आहे. सदर आरोपीतांनी अटकेच्या वेळी त्यांनी नमुद ल्युब ऑईलचा साठा हा नमुद गुन्हयातील इतर आरोपी कादर मोईद्दील सय्यद उर्फ अल्ताफ याच्याशी संगनमत करुन त्यांनी समुद्रातील लागलेल्या मोठया जहाजातुन अनधिकृतपणे काढुन सदर बार्जमध्ये घेऊन अनधिकृतपणे विक्री करण्यासाठी ट्रॉम्बे येथील जुन्या जेट्टी येथे घेऊन आल्याची कबुली दिली. सदर आरोपीतांनी यापूर्वी देखील इतर गुन्हा नोंद प्रकरणी अशाच प्रकारे

अवैधरित्या तस्करीमार्गाने पेट्रोलियम पदार्थाचा साठा प्राप्त करुन त्याची विनापरवाना बेकायदेशिर विक्री करीत असतांना पोलिस पथकाने त्यांना रंगेहाथ पकडले आहे. सदर आरोपी हे सराईत गुन्हेगार असुन प्रस्तूत प्रकरणी जप्त करण्यात आलेल्या साई-शाह या बार्ज (नौका) मधील जप्त करण्यात आलेला एकुण ६००० लिटर ल्युबऑईलचा साठा हा गैरमार्गाने व बेकायदेशीररित्या मिळविल्याचे सिध्द होत असल्याने सदरचा संपूर्ण ल्युबऑईलचा साठा अवैध असल्याचे निष्पन्न होत आहे. सबब, नमुद गुन्हयात जप्त करण्यात आलेला ल्युबऑईलचा संपूर्ण बेकायदेशिर साठा रासायनिक पृथःकरण अहवालाच्या अधिन राहून शासनजमा करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणी, तपासी पोलिस अधिकारी यांनी सुनावणीच्यावेळी केलेल्या खुलाशात नमुद गुन्हयातील जप्त करण्यात आलेल्या छोटया बार्जचे मालक यांचा पत्ता मिळुन आलेला नसल्याचे सांगुन सदरचे बार्ज नमुद गुन्हयातील आरोपीतांनी भाडेतत्वावर घेतल्याचे सांगितले. तसेच बार्ज (नौका) या बोटीचे भाडेकरारनाम्याद्वारे ताबेदार सुरेंद्र श्रीकृष्ण यादव यांनी सुनावणीच्या वेळी सादर केलेल्या निवेदनासोबत जप्त बोटी संबंधी केंद्रशासनाच्या सर्टीफिकेट ऑफ रजिस्ट्री ऑफ अ फिशिंग बोट या संस्थेकडून प्रथम नोंदणी प्रमाणपत्र क्र. एफ/एमओआर/०१/टी-५९३७ दिनांक १३/०१/२०१० रोजी निर्गमित केलेल्या प्रमाणपत्राची छायांकित प्रत सादर केली असुन सदर नोंदणीकृत प्रमाणपत्रावर फायबर बोटीचे नाव एमएफबी-साई शाह व मालकाचे नांव श्रीमती शाहताज सैय्यद जाफर असे नमुद आहे. सदर फायबर बोटीचे ताबेदार सुरेंन्द्र श्रीकृष्ण यादव यांनी या प्रमाणपत्राव्यतिरीक्त बोटीचे भाडेकरारपत्र अथवा इतर पुरावादर्शक कागदपत्रे सादर केले नसुन ते त्यांचेकडे उपलब्धही नसल्याचे सांगितले. तथापी, जप्त करण्यात आलेल्या साई-शाह या बार्ज (नौका) चे मालक यांना त्यांचे म्हणणे मांडण्यासाठी सुनावणीस पाचारण करुनही ते सुनावणीस उपस्थित राहिले नाहीत. यावरुन जप्त बोटीचे मालक यांना याबाबत काहीही सांगावयाचे नसल्याचे आणि कोणताही खुलासा करावयाचा नसल्याचे तसेच जप्त मुद्देमाल परत मिळण्यासंदर्भात कसलेही स्वारस्य नसल्याचे व नोटीसीतील आरोप मान्य असल्याचे दिसुन येते. म्हणजेच सदर बोटीचे मालक शाहताज सैय्यद जाफर यांनी विनाकरारनामा सदरची बोट सुरेंन्द्र श्रीकृष्ण यादव यांनी तस्करीमार्गे केल्या जाणाऱ्या अवैध वाहतुकीसाठी त्यांच्या स्वाधीन केल्याचे दिसुन येत असल्याने नमुद गुन्हयात त्यांचाही सहभाग असल्याचे सकृतदर्शनी दिसुन येते.

प्रस्तुत गुन्ह्यात वरिलप्रमाणे बेकायदेशीररित्या मिळविलेले ल्युबऑईलचा साठा साई-शाह नावाच्या बोटीमध्ये बेकायदेशिररित्या खरेदी करुन विनापरवाना साठवणूक केले असल्याचे निष्पन्न झाले आहे. उक्त साई-शाह बोटीचे मालक शाहताज सैय्यद जाफर यांनी सदरची बोट भाड्याने दिली असली तरी, सर्वसंबंधितांनी संगनमत करुन विनापरवाना व बेकायदेशीररित्या मिळविलेल्या ल्युबऑईलची वाहतूक, साठवणूक व विक्री

करण्याकरीता सदर बोटीचा अवैध व्यवसायासाठी वापर त्यांच्या संमतीने केला असल्याचे सिध्द होत असुन प्रस्तुत प्रकरणी जरी बोटीच्या मालकाच्या अपरोक्ष सदरचा गुन्हा घडला असला तरी, मालक या नात्याने त्यांच्या बोटीचा गैरवापर होणार नाही याची सर्वेतोपरी दक्षता घेणे आवश्यक आहे. सबब, जीवनावश्यक वस्तु कायदा १९५५ चे कलम ६ (अ)(क) मधील तरतुदीनुसार सदरची जप्त करण्यात आलेली साई-शाह फायबर बोट ही त्याच्या बाजारमुल्या एवढी रक्कम भरण्यास बोटीचे मालक तयार असल्यास, तेवढी रक्कम भरल्यानंतर सदरची बोट त्याच्या मालकास परत करण्याच्या अथवा बोटीचे मालक सदरची रक्कम भरण्यास तयार नसल्यास या बोटीची जाहीर लिलावाने विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेली आहे.

सबब, उपरोक्त विवेचन विचारात घेऊन मी, नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई, मला जीवनावश्यक वस्तु कायदा १९५५ चे कलम ६-अ नुसार प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये ट्रॉम्बे पोलिस ठाणे, मुंबई येथे गुन्हा नोंद क्र. १४५/२०१२, दिनांक २८/०७/२०१२ मध्ये जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालासंदर्भात खालील आदेश देत आहे.

**आदेश :-**

१) जप्त करण्यात आलेल्या साई-शाह या फायबर बोटमधील संपुर्ण एकूण ६००० लिटर्स ल्युबऑईलचा साठा शासनजमा करण्यात यावा.

२) सदर साठ्याची पोलीसांनीं सद्याच्या प्रचलित दरानुसार वैध परवानाधारकास विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करावी.

३) जप्त करण्यात आलेली साई-शाह बोट ही शासनजमा करण्यात येत आहे. सदर बोटीची बाजारमुल्या एवढी रक्कम भरण्यास बोटीचे मालक तयार असल्यास, तेवढी रक्कम भरल्यानंतर सदरची बोट त्याच्या मालकास परत करण्यात यावी व सदर रक्कम शासनजमा करावी. तथापी, अशी कार्यवाही करण्यापूर्वी संबंधित बोटीच्या मालकीबाबत पोलीसांनी खातरजमा करावी.

४) अथवा बोटीचे मालक सदरची रक्कम भरण्यास तयार नसल्यास सदर बोटीची जाहीर लिलावाने विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करावी. तथापी, सदरची बोट लिलाव करण्यापूर्वी या कार्यालयास तसे लेखी सुचीत करावे.

CONTROLLER OF RATION

6000

वरीलप्रमाणे जप्त मुद्देमालाची पोलिसांनी विल्हेवाट लावून येणारी रक्कम पोलीसांनी वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई (Financial Advisor & Dy. Secretary, Food, Civil Supply & Consumer Protection Dept., Govt. of Maharashtra, Mumbai) यांचे कार्यालयाच्या वैयक्तिक ठेव लेख्यात "४४०८" या लेखाशिर्षात जमा करावी.

सही/-
नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.

प्रति,

१) अकबर अन्सारी सैय्यद
२) सुरेंद्र श्रीकृष्ण यादव
३) मोहमद अहमद खान
४) अल्ताफ
५) साई शाह या फायबर बोटीचे मालक

(वरिष्ठ पोलीस निरीक्षक, ट्रॉम्बे पोलिस ठाणे, मुंबई यांचे मार्फत)

प्रत,

१) वरिष्ठ पोलिस निरिक्षक, ट्रॉम्बे पोलिस स्टेशन, मुंबई यांना कळविण्यात येते की, सदरचे आदेश संबंधीतांवर बजावून त्याची दिनांकित पोच या कार्यालयास तात्काळ सादर करावी. तसेच आदेशाची अंमलबजावणी करुन पूर्तता अहवाल विनाविलंब या कार्यालयास सादर करावा.
२) वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, बंगाली गर्ल्स हायस्कूल, चर्चगेट, मुंबई यांना माहितीसाठी अग्रेषित.
३) निवड नस्ती.

CONTROLLER OF RATIONING & DIRECTOR OF CIVIL SUPPLIES
HEAD OFFICE

नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.